राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व्याप्ती (NRDWP - Coverage) अंतर्गत विंधण विहिरीवर विद्युत व सौर उर्जेवर आधारीत दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत सुधारीत मार्गदर्शक सूचना

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन निर्णय क्रमांकः लपापु-२०१६/ प्र. क्र. ०६/ पापु-१५

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई - ४००००१
तारीख: २१ जानेवारी, २०१६

**वाचा** -

१) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः ग्रापापु-५३१०/ प्र.क्र. ०४/ पापु-१५, दिनांक २९.१२.२०११**
२) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः ग्रापापु-५३१०/प्र.क्र.२१७/पापु-१५, दिनांक २९.१२.२०११**
३) **शासन शुध्दिपत्रक समक्रमांकः दिनांक १७.१०.२०१२**
४) **शासन शुध्दिपत्रक समक्रमांकः दिनांक २४.०७.२०१५**
५) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः ग्रापाधो-१११४/ प्र. क्र. २२/पापु-०७, दिनांक ०९.०७.२०१४**
६) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः ग्रापाधो-११११/प्र. क्र.१३४/पापु-०७, दिनांक २०.०२.२०१५**

**प्रस्तावना** -

राज्यात उच्च क्षमतेच्या विंधण विहिरींवर विद्युत व सौर उर्जेवर आधारीत दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहेत.

केंद्र शासन व राज्य शासन यांनी पाणी पुरवठा योजना राबविण्यामध्ये काही धोरणात्मक बदल केलेले आहेत. शासनाचे बदललेले धोरण विचारात घेऊन उपरोक्त योजनांमध्ये सुलभता, सुसूत्रता व गती आणण्याकरीता सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** -

विद्युत व सौर उर्जेवर आधारीत दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजना संदर्भाधीन प्रचलित शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहेत. सदर योजना प्रस्तुत शासन निर्णयानुसारच राबविल्या

जातील. तथापि समितीचे सदस्य सचिव, निधी वितरणाची कार्यप्रणाली, योजनेची अंमलबजावणी इत्यादी बाबींमध्ये अंशत: बदल करुन खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) जिल्हास्तरीय समिती - या समितीमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (व्याप्ती) संबंधीचे विषय हाताळतांना वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या ऐवजी उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद हे सदस्य सचिव राहतील. तथापि वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा हे सदस्य राहतील.

ब) अनुदान / निधी वितरण कार्यप्रणाली - वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या संयुक्त बँक खात्यावर वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे ऐवजी उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद यांचे नाव लावून सदर खाते मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद यांनी ते संयुक्तपणे पुढे चालू ठेवावे.

क) उपरोक्त योजना यापुढे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद यांचे मार्फत राबविण्यात येतील. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सद्य:स्थितीत जी कामे करीत आहेत ती सर्व कामे यापुढे उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद हे करतील.

ड) योजनांच्या देयकाची अदायगी, झालेल्या कामाची गुणवत्ता तपासून, मोजमाप नोंद पुस्तिका पूर्ण करुन मुल्यांकनानुसार उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावी व अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेकडे सादर करावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२११२१४१९७७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( दिपक ल. पिंपळे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. विभागीय आयुक्त, सर्व

२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

३. जिल्हाधिकारी (सर्व)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
५. अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
६. सह संचालक (अभि.) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, ( सर्व )
८. मुख्य खोदन अभियंता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे / नागपूर
९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ( सर्व )
१०. वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, ( सर्व )
११. उप अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उप विभाग, जिल्हा परिषद ( सर्व )
१२. सर्व नियंत्रक अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
१४. निवड नस्ती पापु-१५